वेचक | वेधक



## ‘करोनाविरुद्ध एक डोस पुरेसा नाही’

**सॅन फ्रान्सिस्को :** सर्वसामान्यांसाठी अद्याप करोना लस आलेली नाही. मात्र, या लसीसंदर्भात तज्ज्ञ आणि दिग्गज मंडळींची विधाने यायला सुरुवात झाली आहे. यातच आता बिल गेट्स यांनी महत्त्वाचे आणि मोठे विधान केले आहे. करोनापासून बचाव करण्यासाठी लोकांना करोना लसीचे एकपेक्षा अधिक डोस घ्यावे लागू शकतात, असे त्यांनी म्हटले आहे. मायक्रोसॉफ्टचे सह संस्थापक गेट्स म्हणाले, सध्या तरी, अशी एकही लस दिसत नाही, जी एकाच डोसमध्ये परिणामकारक ठरेल.

## पाकिस्तानचे नवे डावपेच!

**इस्लामाबाद :** कुलभूषण जाधव यांना वकील देण्याच्या बाबतीत पाकिस्तान सरकारने आता इस्लामाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत पाकिस्तान सरकारने आयसीजेच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी वकील नेमण्याची परवानगी मागितली आहे. मात्र, जाधव भारताच्या मदतीशिवाय वकिल करू शकत नाहीत, असेही याचिकेत म्हटले आहे. तसेच जाधव यांनी फेरविचार याचिका नाकारली असल्याचेही पाकिस्तान सरकारने न्यायालयात सांगितले आहे.

## काँग्रेसमध्ये गळती सुरुच

**भोपाल :** मध्य प्रदेशातील माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोसळल्यानंतर काँग्रेसला गळती लागली होती. ही गळती अजूनही थांबल्याचे दिसत नाही. महिनाभरात काँग्रेसच्या तिसऱ्या आमदाराने राजीनामा दिला असून, भाजपात प्रवेश केला आहे. मध्य प्रदेशात होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीच्या आधीच काँग्रेसला आणखी एक धक्का बसला आहे.

### पायलट यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाचा आज निर्णय

# विधानसभेत बहुमत सिद्ध करू : गेहलोत

**जयपूर :** सध्या काढून टाकण्यात आलेले उपमुख्यमंत्री सचिन पायलट आणि त्यांचे निष्ठावंत आमदार यांनी केलेल्या बंडखोरीनंतर राजस्थानमध्ये सध्या सुरू असलेल्या राजकीय पेचप्रसंगाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी गुरुवारी विधानसभेत बहुमत असल्याचे प्रतिपादन केले. ते म्हणाले, आमच्याकडे बहुमत आहे आणि काँग्रेसचे आमदार एकत्र उभे राहताच अधिवेशन बोलावतील.

पायलट गट कोर्टात जात असताना गेहलोत म्हणाले, जे न्यायालयात गेले त्यांनी चूक केली आहे. कोर्टाच्या खटल्याचा डिफेक्शन एंटी कायद्याशी काही संबंध नाही. आम्ही दोनवेळा सीएलपी (काँग्रेस विधिमंडळ पक्ष) बैठक बोलावली जेणेकरून गेलेले आमदार पुन्हा येतील मात्र ते परत आले नाहीत.

गेहलोत पुढे म्हणाले, असे वाटले की त्यांना दुसरा मार्ग स्वीकारायचा आहे. आमच्या मुख्य ‘व्हीप’ने यासंदर्भात याचिका दाखल केली. खरे तर, सभापती नोटीस बजावू शकतात, त्यांना कॉल करू शकतात आणि त्यांच्याशी बोलू शकतात.

बंडखोर आमदारांना ओलीस ठेवल्याचा दावाही गहलोत यांनी केला. ज्यांना ओलिस ठेवले गेले आहे आणि बाऊन्सर्सच्या नजरेत आहेत, आम्ही आशा करतो की ते परत येतील तेव्हा ते आमच्याबाजूने मतदान करतील. मात्र असे झाले नाही तरी आमच्याकडे बहुमत आहे, आणि आम्ही बहुमत सिद्ध करू शकतो.





### गेहलोत यांच्या भावावर ‘ईडी’चे छापे

खत घोटाळ्याशी संबंधित मनी लॉड्रिंगप्रकरणी देशभरातील धाडसत्रात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या थोरल्या बंधूच्या जोधपूर जिल्ह्यातील मंदोर परिसरातील शेतवाडी आणि घरावर छापे टाकले. या कारवाईत ईडीच्या अधिकाऱ्यांच्या मदतीला केंद्रीय राखीव पोलिस दलाचे (सीआरपीएफ) जवान होते. सीआरपीएफचे जवान गेहलोत यांच्या मंदोरस्थित शेतवाडी (फार्महाऊस) आणि घरांवर तैनात असल्याचे दिसले.

गेहलोत यांनी त्यांच्या मोठ्या भावाच्या कार्यालयात आणि फार्म हाऊससह अंमलबजावणी संचालनालय, केंद्रीय अन्वेषण ब्यूरो आणि प्राप्तिकर विभागामार्फत मारण्यात येणाऱ्या छाप्यांच्या कारवाईबद्दल केंद्र सरकारवर टीका केली. गृहमंत्री अमित शहा यांच्या निर्देशानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शासनकाळानुसार ईडी, सीबीआय, आयटी इत्यादींनी ज्या प्रकारे छापे टाकण्यास सुरुवात केली आहे, ते आम्हाला भाजपची विचारधारा उघडकीस आणण्यापासून रोखणार नाहीत, असे गेहलोत यांनी सांगितले.

शुक्रवारी उच्च न्यायालय निकाल सुनावणार असून सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. सभापतींच्या नोटीसविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालय सुनावणी घेऊ शकेल की नाही याबद्दल सुप्रीम कोर्ट सुनावणी करेल. सर्वोच्च न्यायालय कायद्याच्या मोठ्या प्रश्नावर विचार करेल. सर्वोच्च न्यायालय सभापतींच्या कार्यक्षेत्र विरूद्ध न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात विचार करेल.

### जोशी यांची याचिका फेटाळली

राजस्थान उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात राजस्थानचे अध्यक्ष सीपी जोशी यांची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अरुण मिश्रा, न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती कृष्णा मुरारी यांच्या खंडपीठाने राजस्थान सभापतींच्या याचिकेवर सुनावणी केली. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला, परंतु उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन असेल, असे ते म्हणाले.

# सर्वोच्च न्यायालयात यूजीसीच्या मार्गदर्शक नियमावलीला आव्हान

**नवी दिल्ली :** देशात करोना संकट उद्भवलेलं असतानाच विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय ऐरणीवर आला आहे. अनेक राज्यांनी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी नव्याने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. सप्टेंबर अखेरपर्यंत परीक्षा घेण्याचे या नव्या सूचनांमध्ये म्हटले आहे. या नव्या सूचना रद्द करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात एका केंद्र शासित प्रदेशासह १३ राज्यातील विद्यार्थ्यांनी याचिका दाखल केली आहे.

करोना संकटामुळे अनेक राज्यांनी परीक्षा रद्द करण्याची मागणी केली असून, यूजीसीने जाहीर केलेली नवी नियमावली रद्द करण्यासाठी एका केंद्र शासित प्रदेशासह १३ राज्यातील विद्यार्थ्यांनी याचिका दाखल केल्या असून, सर्व याचिकांवर न्यायमूर्ती एल. नागेश्वर राव आणि न्यायमूर्ती हेमंत गुप्ता यांच्या दोन सदस्यीय खंठपीठासमोर दोन दिवसांनी सुनावणी होणार आहे.

यापूर्वी आरोग्य मंत्रालयासह गृह मंत्रालयाला एमएचआरडीने एसओपी (मानक कार्यप्रणाली, एसओपी) घेऊन परीक्षा घेण्यास सांगितले आहे. मानव संसाधन विकास मंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांनी यूजीसीच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे अंतिम वर्षाच्या विद्यापीठाच्या परीक्षांच्या नव्या बदलांची माहिती दिली.

करोनाच्या पार्श्वभूमीवर यूजीसीने नव्याने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचना रद्द करून परीक्षा रद्द करण्याची मागणी याचिका कर्त्यांनी केली आहे. यापूर्वी याच मुद्यावरील नॅशनल स्टुडंट युनियन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया याचिका न्यायमूर्ती भूषण यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंठपीठाने फेटाळून लावली आहे.

# एकाच दिवशी ४५ हजार करोनाबाधित


**नवी दिल्ली :** भारतात करोना विषाणूची गती वाढत आहे. देशातील करोना नोंदी रोज नवे उच्चांक करत आहेत. देशात एकाच दिवसात करोना विषाणूचे ४५ हजाराहून अधिक नवीन रुग्ण आढळले आहेत आणि करोना विषाणूमुळे १ दिवसात ११३० लोक मरण पावले.

गेल्या २४ तासांत भारतात करोनाचे ४५ हजार ६०१ रुग्ण आढळून आल्यानंतर भारतात संक्रमित होण्याची एकूण संख्या १२ लाख ३९ हजार ६८४ वर गेली आहे. यामध्ये ४,२५,११४ सक्रिय प्रकरणांचा समावेश आहे. तथापि, एका दिवसात ३१,८७४ रुग्ण बरे झाले आहेत. यासह, देशात बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या ७,८४,२६६ वर गेली आहे. त्याचवेळी, भारतात करोना विषाणूमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढून २९,८९० झाले आहे.

महाराष्ट्रातही करोनाची विक्रमी नोंदी होत आहेत. महाराष्ट्रात करोना विषाणूची मागच्या २४ तासांत १० हजार ५७६ प्रकरणे नोंदली गेली आहेत. यासह, राज्यात संक्रमितांची संख्या वाढून ३,३७,६०७ झाली आहे. ज्यामध्ये १,३६,९८० प्रकरणे सक्रिय आहेत. तर, १,८७,७६९ रूग्ण बरे झाले आहेत. त्याच बरोबर आतापर्यंत १२,५५६ लोक मरण पावले आहेत.

तामिळनाडूमध्ये ५,८४८, दिल्लीत १,२२७, गुजरातमध्ये १,०२०, तेलंगणात १,५५५, उत्तर प्रदेशात २,३००, आंध्र प्रदेशात ६,०४५, पश्चिम बंगालमध्ये २,२२९ प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. काही दिवसांपर्यंत भारतात दररोज करोना विषाणूची सुमारे ३५ हजार प्रकरणे समोर येत होती ती वाढून आता ४० हजारांच्या पुढे जात आहेत.

**सलग दुसऱ्या दिवशी बरे होणाऱ्या रुग्ण संख्येत लक्षणीय वाढ दिसून आली आहे. गेल्या २४ तासांत आतापर्यंत नोंद झालेल्या पैकी सर्वात जास्त म्हणजे २९,५५७ रुग्ण बरे होऊन घरी परतले, तर बरे झालेल्या एकूण रुग्णांची संख्या आता ७,८२,६०६ वर पोहोचली आहे. त्यामुळे बरे होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढून ते ६३.१८ टक्के पर्यंत पोहचले आहे. बरे झालेले रुग्ण आणि सक्रिय रुग्णांच्या संख्येतील तफावत वाढून ती आता ३,५६,४३९ झाली आहे.**



# बिहारमधील पूरस्थिती बिकट; मदतकार्य सुरू

**पाटणा :** बिहारमधील गंडक धरणातून साडेचार लाख क्यूबिक पाणी सोडल्यामुळे पूरस्थिती बिकट झाली आहे. धरणाचे सर्व छत्तीस दरवाजे नेपाळ ते बिहार पर्यंत पाणी सोडण्यासाठी उघडण्यात आले आहेत. गंडक नदीची पातळी सतत वाढत आहे. हे पाहता मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपत्ती व्यवस्थापन विभाग व संबंधित जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना सतर्क राहण्यास सांगितले आहे.

राज्य सरकारने सरण, सिवान, गोपाळगंज , पूर्व चंपारण आणि पश्चिम चंपारण या पाच जिल्ह्यांच्या जिल्हा अधिकाऱ्यांना सखल भागात राहणाऱ्या लोकांना वरच्या भागात आणि सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी सूचना दिल्या आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकेही मदत व बचावासाठी तैनात करण्यात आली आहेत.

गेल्या २४ तासांपासून नेपाळ आणि उत्तर बिहारच्या मैदानाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडल्यामुळे बागमती, कमलाबलान आणि अध्वारा समूहांच्या नद्या धोक्याच्या चिन्हाच्या वर वाहून गेल्या आहेत.

कंटेन्मेंट झोनमध्ये राहणाऱ्या पूरग्रस्तांसाठी शिबिरे लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या लोकांना इतर पूरग्रस्तांपासून वेगळे ठेवले जाईल.



**हवामान खात्याने राज्याच्या विविध भागात मुसळधार पावसासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. १५६ पंचायतमधील तीन लाखाहून अधिक लोक पुरात बाधित आहेत. सुमारे १५ हजाराहून अधिक लोकांना बाहेर काढण्यात आले असून ते मदत शिबिरांमध्ये राहत आहेत.**


क्लासिफाईड्स

पाहिजेत

**Vivekanand Higher Secondary** School Balli Quepem requires Contract / Lecture basis teachers in Konkani & Sociology having Qualification M.A., B.Ed. in Konkani & Sociology for the academic year 2020-2021 and Computer knowledge is essential.Interested candidates attend the interview on Tuesday 28th July 2020 at 9.30 am in the school premises with all necessary documents.

**Vivekanand Higher Secondary** School Balli Quepem requires Library Attendant on Leave Vacancy (CCL) for 6 months with minimum qualification SSC with Library Experience necessary. . Interested candidates attend the interview on Wednesday 29th July 2020 at 10.30 am in the school premises with all necessary documents.


# रशिया - चीनचा अंतराळात युद्धसराव : जपानचा दावा

**टोकियो :** जग करोना विषाणूच्या वाढत्या गंभीर धोक्याबाबत व्यस्त असताना चीन आणि रशिया अंतराळात युद्ध छेडण्याचा प्रयत्न करीत आहेत. जपानच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की त्यांनी चीन आणि रशियाचा ‘किलर’ उपग्रह जपानी उपग्रहाकडे जाताना पाहिले आहे. बीजिंग आणि मॉस्को अंतराळातील उपग्रह अक्षम किंवा नष्ट करण्याचा सराव करीत असल्याची चिंता जपानने व्यक्त केली आहे.

जपानच्या अधिकाऱ्याने सांगितले की, चीन आणि रशियाचे उपग्रह जपानच्या लष्करी उपग्रहांच्या अगदी जवळ आले आहेत. चीन आणि रशियाच्या उपग्रहांना अंतराळात मागोवा ठेवण्याची क्षमता टोक्योमध्ये नसल्यामुळे अमेरिकेने जपानला याबाबत माहिती दिली आहे. असे म्हणतात की या उपग्रहांच्या मदतीने जपान गोपनीय माहिती गोळा करतो.

### अंतराळात अमेरिकेसोबत रशियाचा वाद

जपानी वृत्तपत्र योमिरीने एका उच्च अधिकाऱ्याचा हवाला देत म्हटले आहे की, या वर्षाच्या सुरूवातीस अमेरिकेचा रेकॉनिसन्स उपग्रह रशियाच्या कॉसमॉस २५४२ उपग्रहावर पोहोचला होता. त्यानंतर अमेरिकेनेही धोक्याचा इशारा दिला. असा अहवाल देण्यात आला आहे की, रशियन किलर उपग्रह अमेरिकन मॅजिक उपग्रहाच्या इतक्या जवळ आहे की ताश त्याचा फोटोग्राफिक तपशील मिळवू शकतो.

## आईवर झाडल्या मुलाने गोळ्या

**पाटणा :** जेवणासाठी वारंवार बोलवल्याने संतापलेल्या मुलाने आपल्या आईच्या डोक्यात गोळ्या घालून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना बिहारमधील पाटणा येथील आहे.

आरोपी मुलगा हा आपल्या मित्रांसोबत बोलत होता. त्याचवेळी त्याची आई त्याला वारंवार जेवणासाठी आवाज देत होती. मात्र, वारंवार आई जेवणासाठी बोलवून व्यत्यय आणत असल्याचा राग आल्याने मुलाने संतापाच्या भरात आईच्या डोक्यात गोळी झाडली. ही घटना पटनामधील सीतापूर गावची आहे. मंगळवारी रात्री साडेदहा वाजता ही घटना घडली आहे.

आरोपी २० वर्षीय अंगद यादव याला पोलिसांनी बुधवारी सकाळी पिस्तूलसह अटक केली.

# शांततेसाठी एकतर्फी प्रयत्न होणार नाहीत!

■ भारताने चीनला सुनावले

**नवी दिल्ली :** एलएसी आणि सीमाभागांत भारताकडून शांततेसाठी एकतर्फी प्रयत्न होणार नाहीत, अशा स्पष्ट शब्दांत भारताने चीनला सुनावले आहे.

भारत- चीन वादाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अनुराग श्रीवास्तव यांनी सांगितले की, गेल्या अनेक आठवड्यांत अनेक वक्तव्यांद्वारे भारत-चीन सीमेवरील प्रत्यक्ष ताबा रेषेबाबत (एलएसी) सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. एलएसी आणि सीमाभागातील शांतता राखणे ही दोन्ही देशांची जबाबदारी आहे. १९९३ पासून दोन्ही देशात झालेल्या अनेक करारांमधून याला बळ देण्यात आले आहे. पण एलएसीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताकडून कोणताही एकतर्फी प्रयत्न केला जाणार नाही.

चीन सैन्याच्या कारवाईसह मोठ्या संख्येने सैनिक तैनात करणे आणि वर्तनातील बदलांसबोतच तसेच अनुचित आणि अयोग्य दाव्यांचा समावेश आहे. हे सर्व दोन्ही देशांमध्ये झालेल्या करारांचे उल्लंघन करणारे आहे. भारत एलएसीचे अवलोकन आणि त्याचा सन्मान करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे. दोन्ही देशांत शांतप्र स्थापित करण्यासाठी भारत-चीन सीमा भागातून एलएसीवरून सैनिकांना मागे हटवण्यासंदर्भात विशेष प्रतिनिधिंच्या चर्चेत सहमती झाली होती. हा निर्णय यशस्वी करण्यासाठी दोन्ही देशात लष्करी आणि मुत्सद्दी स्तरावर चर्चा सुरू आहे. सीमाभागातील शांतता राखणे हा द्विपक्षीय संबंधांचा आधार आहे. यामुळे दोन्ही देशांच्या विशेष प्रतिनिधींमध्ये ठरल्याप्रमाणे चीनने प्रामणिकपणे सैनिकांना मागे हटवून डी-एस्केलेशनची प्रक्रिया पूर्ण करावी आणि सीमेवर लवकर शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे, भारतातर्फे सांगण्यात आले आहे.

### ‘ध्रुवास्त्र’ची यशस्वी चाचणी

ओडिशातील बालासोर येथे भारताच्या हेलिकॉप्टरवरून सोडण्याच्या ध्रुवास्त्राची चाचणी यशस्वी झाली असून यात प्रत्यक्ष हेलिकॉप्टरमधून ते सोडण्यात आले नव्हते. हे रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र असून ते प्रत्यक्षात नाग (हेलिना) क्षेपणास्त्र आहे, त्याचे नामकरण ‘ध्रुवास्त्र’ असे करण्यात आले आहे. भारतीय लष्करी दलांनी या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली असून बालासोर येथे १५ व १६ जुलैला त्याच्या हेलिकॉप्टरमधून सोडण्याच्या चाचण्या यशस्वी झाल्या होत्या.


**BEFORE THE JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA MAPUSA, BARDEZ, GOA.**
**Mutation Case No. : 72994,**
**Village : Candolim**

1. Mangaldas Vishwanath Shirodkar, 2. Meghana Mangaldas Shirodkar, both r/o. Velha Parra Bardez, Goa.
...........**Applicants**

**V/s**

1. Anthony Joseph Lobo, 2. Luis Antonio Do Carmo Rodrigues e Chico, 3. Shannon Crystal Lobo, 4. Luiza (Maria) Antonio Rodrigues Chico
....................**Opponents**

**PUBLIC NOTICE**

To all opponents/legal heirs/any other interested parties

**WHEREAS** the applicant Mangaldas Vishwanath Shirodkar and Meghana Mangaldas Shirodkar. both r/o. Velha Parra Bardez Goa, has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include their names in the Occupants column under Sy. No. 226/2 of village Candolim. Taluka Bardez, as per Deed of Sale Reg.No. 2210, Book No. I. Vol. No. 778 dated 13/12/2000 executed before Sub Registrar of Bardez and Deed of Sale Reg. No. 529, Book No. I, Vol. No. 286 dated 03/04/1995 executed before Sub Registrar Bardez.

**AND WHEREAS** the notice in Form no. X were served to all the interested parties by registered A/D. However some A.D. card returned back with the Postal remarks "Party Expired Party Left/Not Known/Address out of Station" and he do not known the detailed addresses of the Legal heirs and whereabouts of the interested parties.

**AND WHEREAS** the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20 (1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the address of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the Certifying Officer.

Place : Mapusa
Date : 02-07-2020

SEAL Sd/-
**(Anil Rane Sardessai)**
Joint Mamlatdar - VI of Bardez
Mapusa - Goa.

**NOTICE**

Board Meeting to consider the unaudited quarterly financial results for the quarter ended **30th June, 2020** will be held on Thursday, **6th August, 2020.**

For **Kore Foods Limited**
**Puja Joshi**
Company Secretary-cum-Compliance Officer
Vision House, Tivim Industrial Estate, Mapusa, Goa 403 526.
Dated: 24/07/2020

**TRANSFER OF VEHICLE**

My Wife late Smt. Piedade Faria alias Piedade Rocha alias Piedade A Faria, r/o H.No.215, Sirvoi, Quepem, South-Goa was owning a Tata Tipper bearing Reg.No. GA-09-U-3163 and Honda Activa bearing Reg. No. GA-09-J-0653. After her death I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public or any other institution, Bank having any objection for such transfer may send their objection along with documentary proof to the R.T.O. Quepem or to me within 15 days time from today.
Dated:-23/7/2020

Sd/-
Mr. Antonio Rebelo alias
Antonio Rebelo Faria
R/o H.No.215, Sirvoi, Quepem, South-Goa


# भारतीय लष्करात महिलांच्या स्थायी कमिशनला मान्यता

**नवी दिल्ली :** भारतीय सैन्यात महिलांच्या स्थायी कमिशनला केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने अधिकृतपणे मान्यता दिली आहे. गुरुवारी सरकारने जारी केलेल्या स्वीकृती पत्रानंतर आता महिलांना सैन्यात विविध उच्चपदांवर नियुक्त केले जाईल.

या आदेशानुसार शॉर्ट सर्व्हिस कमिशनच्या (एसएससी) महिला अधिकाऱ्यांना भारतीय लष्कराच्या दहाही भागात स्थायी कमिशनची परवानगी देण्यात आली आहे.

म्हणजेच आर्मी एअर डिफेन्स, सिग्नल, इंजिनियर, आर्मी एव्हिएशन, इलेक्ट्रॉनिक्स, मेकेनिकल इंजिनिअरिंग, आर्मी सर्व्हिस कॉर्प्स, आर्मी ऑर्डिनेन्स कॉर्प्स आणि इंटेलिजेंस कॉर्प्स येथेही स्थायी कमिशन उपलब्ध असेल. यासह, ही सुविधा न्यायाधीश आणि ॲडव्होकेट जनरल, आर्मी एज्युकेशनल कॉर्प्समध्येही उपलब्ध असेल.

या आदेशानंतर आता परमानेंट कमिशन सिलेक्शन बोर्ड महिला अधिकारी तैनात करू शकेल. यासाठी लष्कराच्या मुख्यालयाने इतरही अनेक कारवाई केल्या आहेत. हा निर्णय पूर्ण झाल्यावर निवड मंडळामार्फत कारवाई करण्यात येईल आणि सर्व एसएससी महिलांच्यावतीने सर्व कागदपत्रे तयार केली जातील. तथापि, ही नियुक्ती लढाई कारवाईत होणार नाही, सर्वोच्च न्यायालयानेही आपल्या निर्णयामध्ये ती वेगळी ठेवली होती.

लष्कराने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सर्व महिला अधिकाऱ्यांना देशाची सेवा देण्याची संधी देण्यासाठी भारतीय सेना पूर्णपणे तयार आहे. या कायमस्वरुपी कमिशनची बरीच मागणी होती.

भारताकडे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सैन्य आहे. अशा देशाच्या लष्करात महिलांचा वाटा ३.८ टक्के इतका आहे. हवाई दलात मात्र, महिलांचा १३ टक्के इतका वाटा आहे. तर नौदलात ६ टक्के इतका वाटा आहे. भारतीय लष्करात पुरुष अधिकाऱ्यांची संख्या ही ४० हजारांच्या वर आहे. तर महिला अधिकाऱ्यांचे प्रमाण हे दीड हजार इतकेच आहे.



**या प्रकरणाची सुप्रीम कोर्टात सुनावणीही झाली, तेथे केंद्राला कोर्टाने फटकारले. हे आयोग बनवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सरकारला तीन महिने दिले होते. हा ऐतिहासिक निर्णय फेब्रुवारी महिन्यात कोर्टाने दिला होता. सर्व नागरिकांना संधीची समानता, लैंगिक न्याय सैन्यात महिलांच्या सहभागास मार्गदर्शन करेल, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली होती.**


**PUBLIC NOTICE**

PUBLIC NOTICE is hereby given that M/S GAO PROPERTIES LLP, the owner of the property ie., HOUSE NO.278/1 built in the property admeasuring 1350 sq.mtrs, bearing Survey no.126/3 of Village Socorro, identified as `GHORBATTA' or `BARROS' situated at the ward of Vaddem, Porvorim, within the limits of Village Socorro, Taluka and Registration Sub District of Bardez, District of North Goa, in theState of Goa, which property is described in the office of Land Registrar under no.2317 of Book B-6(new) and is not enrolled in the Taluka Revenue Office, bounded on North by Survey no.124/26 and Nalla; on South by a road bearing Survey no.126/4; on East by Survey no.125/1 and 125/1-B of Socorro and on the West by Survey no.126/2 of Socorro, INTENDS TO SELL THE SAME TO ONE OF OUR CLIENTS.

Any person/persons, Banks, Financial Institutions having any claim, right, title or interest in/over the Said PROPERTY AS DESCRIBED ABOVE, by way of purchase, inheritance, gift, lease, mortgage or any other legally enforceable right of whatsoever nature are called upon to file their objections accompanied with supporting documents, with the undersigned within 15 days from the date of publication of this Notice, failing which it will be presumed that there are no objections/impediments to the SALE of the said PROPERTY and the said transaction will be completed and the objections if any shall be deemed to have been waived.

**Adv. Ajay Kumar**
Ajay Kumar & Associates,
Advocates
302, 3rd Floor, Milroc Neurekar Pride
M.G. Road, Near Azad Maida, PANAJI, GOA-403001
Email: Ajaykumar.associates@gmail.com
Mobile: 9503094492 & 9949544492

**PANAJI - GOA**
**24.07.2020**